MHRG190007532023

:: **<u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ३५/२००६ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश</u>** ::

केस फाईलची पडताळणी केली असता, माझे पुर्व अधिकारी यांनी निशाणी क्र.१ वर आदेश करुन प्रकरण युक्तीवादाकरिता नेमलेले आहे. केस फाईलची पडताळणी केली असता, सदर रेफरन्स अर्जाचे कामी अर्जदार यांनी मुल्यमापक यांचा मुल्यमापन अहवाल, नकाशा व इतर महत्वाची कागदपत्रे दाखल करण्याकरिताचा निशाणी क्र.१६ कडील अर्ज माझे पुर्व अधिकारी यांनी मंजुर केलेला आहे. निशाणी क्र.१७/१ ते १३ वरील कागदपत्रांवर ३६ ते ४६ असे निशाणी क्रमांक लिहिलेले असल्याचे दिसुन येते परंतु रोजनाम्याचे अवलोकन केले असता, अर्जदारतर्फे दाखल केलेले विनंती अर्ज, प्रतिज्ञापत्र, वकीलपत्र आणि पत्ता पुरसिस अशा कागदपत्रांना ३६ ते ४६ असे निशाणी क्रमांक दिलेले आहेत. सदर रोजनाम्यामध्ये निशाणी क्र.१७/३ ते १३ कागदपत्रांचा उल्लेख अनावधानाने केला नसल्याचे दिसुन येत आहे. सदर कागदपत्रांवर निशाणी क्रमांक लिहिलेले आहेत परंतु तेच निशाणी क्रमांक वर नमुद विनंती अर्ज, इत्यादींना दिल्याचे दिसुन येतात. निशाणी क्र.१७/३ ते १३ वर सुची क्र.२ च्या प्रती आणि न्यायनिर्णयाच्या सहीशिक्क्यांच्या प्रती दाखल केल्या असल्याचे दिसुन येते. सदर कागदपत्रांना नव्याने निशाणी क्रमांक देण्यात येवुन पुराव्यात वाचणे आवश्यक आहे. सदरची तांत्रीक चुक दुरुस्त केली तर सदरचे प्रकरण गुणानुगुणांवर निकाली होऊ शकेल. सबब, निशाणी क्र.१७/३ ते १३ या कागदपत्रांना नव्याने निशाणी क्रमांक देण्यात येतात.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.03.24 16:14:56 +0530

महाड,
दिनांकः२३.०३.२०२६

(**श्रीमती एच. आर. जाधव**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड